2 JUL 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'फेसाटी' कृषी संस्कृतीचे प्रतीक : डॉ. पाटील

म. टा. वृत्तसेवा, मिरज

'फेसाटी या कादंबरीत कृषी संस्कृतीचे चित्रण लेखक नवनाथ गोरे यांनी अतिशय समर्पकपणे केले आहे. त्यानी या साहित्यकृतीत वापरलेली शब्दकळा मातीतलीच आहे. त्यानी वापरलेली अनगड भाषा

## नवनाथ गोरेंचा सांगलीत सत्कार

हे या कादंबरीचे यश आहे. नव्याने लिहिणाऱ्या साहित्यिकांनी आपल्या भाषेत लिहावे,' असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मोहन पाटील यांनी केले.

सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या सभागृहात जिल्ह्यातील साहित्यप्रेमी व शब्दसाहित्य विचारमंच यांच्या वतीने 'फेसाटी'ला साहित्य अकादमीचा युवा

नामदेव भोसले




लेखक नवनाथ गोरे यांचा सांगलीत विविध संस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार प्रा. डॉ. मोहन पाटील यांच्या हस्ते संत तुकारामांची प्रतिमा, शाल व श्रीफळ व पुष्पहार देऊन मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आला.

या वेळी प्राचार्य डॉ. अशोक बाबर, संजय पाटील, श्रीनिवास जरंडीकर, नामदेव माळी, डॉ. विष्णु वासमकर, प्रतिभा जगदाळे, प्रा. संजय ठिगळे, दयासागर बन्ने, प्रा. दिलीप बिराजे, महेश खराडे आदी मान्यवर उपस्थित होते. अभिजीत पाटील यांनी स्वागत केले.

या वेळी बोलताना डॉ. मोहन पाटील म्हणाले, 'आता खेड्यापाड्यातील नवी पिढी लिहित आहे, याचे समाधान आहे. मात्र, आपले स्वप्नवत अनुभव मांडण्यापेक्षा आपल्या परिसरातील, मातीतीलच लिहावे, नवनाथ गोरेंनी लिहिलेली कादंबरी नव्याने लिहिणाऱ्यांना प्रेरणादायी आहे.'

ज्येष्ठ समीक्षक प्रा. जी. के. ऐनापूरे म्हणाले, 'आजच्या युवा पिढीने आपल्या अवलोकना बाबत सजग राहिले पाहिजे. आपली नेमकी भूमिका आणि आपली बाजू समजून घेऊन साहित्यिकांनी लिहिले पाहिजे. आज शेतीची ओढ कमी होत आहे.' समाजात श्रम संस्कृती रुजवणे गरजेचे आहे. नव्या पिढीतील साहित्यिकांनी सभोवतालच्या परिसरावर लिहिले पाहिजे, त्यासाठी वर्तमान परिस्थितीशी जोडून घेतले पाहिजे.'

या वेळी समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, प्राचार्य आर. जी. कुलकर्णी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. नवनाथ गोरे यांनी आपले अनुभव कथन करून आपुलकीने केलेल्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सुधीर कदम यांनी आभार मानले. या वेळी साहित्यिक व साहित्य रसिक उपस्थित होते.

2 JUL 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : सामाजिक वनीकरण,वनविभागातर्फे रविवारी शेंडा पार्क येथे चाळीस हजार झाडे लावण्याचा प्रारंभ झाला. यावेळी विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता. दुसऱ्या छायाचित्रात वृक्षारोपण करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आयुक्त डॉ. चौधरी यांच्यासह विविध मान्यवर दिसत आहेत. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# पाच वर्षांत ५० कोटी वृक्षांची लागवड

## पालकमंत्री पाटील; यंदा १३ कोटी झाडे लावणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : पर्यावरण संतुलनासाठी शासनाने पाच वर्षांत ५० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत ७ कोटी झाडांची लागवड झाली आहे. यंदा १३ कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट आहे. झाडे लावण्याबरोबरच ती जोपासण्याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.



वन विभाग, सामाजिक वनीकरण आणि कृषी विभागातर्फे यंदाच्या वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ तसेच स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषिदिनाचा प्रारंभ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शेंडा पार्क परिसरात झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, आमदार अमल महाडिक, संदीप देसाई, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, वनसंरक्षक अरविंद पाटील, राजर्षी शाहू कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता गजानन खोत, उपवन संरक्षक प्रभुनाथ शुक्ल, विभागीय वन अधिकारी दीपक खाडे, कृषी सहसंचालक उमेश पाटील उपस्थित होते. तसेच कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी, उपविभागीय वन अधिकारी माणिकराव भोसले, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपजिल्हाधिकारी अमित माळी, चंद्रकांत सूर्यवंशी उपस्थित होते.

### पुढील वर्षी ३३ कोटी वृक्ष : मंत्री पाटील

दिवसेंदिवस कमी होत चाललेली वृक्षसंपदा ही पर्यावरणाच्या दृष्टीने चिंतेची बाब असल्याचे सांगून पालकमंत्री पाटील म्हणाले, की राज्यात पर्यावरणरक्षणासाठी किमान ४०० कोटी झाडे लावणे गरजेचे आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. लागवडीबरोबरच वृक्ष जगविणे हे महत्त्वाचे आहे. वृक्षसंवर्धनासाठी समाजाने योगदान देणे गरजेचे आहे. राज्यात पहिल्या वर्षी १ कोटी, दुसऱ्या वर्षी २ कोटी, तिसऱ्या वर्षी ४ कोटी आणि यंदा १३ कोटी वृक्षांची लागवड करण्यात येत आहे.

### ठिबकसाठी योजना करावी

शेंडा पार्क येथील झाडांचे संगोपन, पाणी आणि ठिबक यासाठी कृषी महाविद्यालयाने सविस्तर योजना तयार करावी, त्यांना शासन योजनेतून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री पाटील यांनी दिली.

2 JUL 2018
महाराष्ट्र टाइम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रीन संडे...

## वृक्षारोपण मोहिमेचा पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते प्रारंभ

कोल्हापूर टाइम्स टीम

'सरकारने पर्यावरण संतुलनासाठी राज्यात पाच वर्षांत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून आजअखेर ७ कोटी रोपांची लागवड पूर्ण झाली आहे. यंदा कोल्हापुरात २८ लाख वृक्षांची केली जाणार आहे. या रोपांचे संरक्षण आणि संवर्धनाची प्रत्येकाची जबाबदारी आहे,' असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

सरकारच्या वृक्षलागवड मोहिमचा जिल्ह्यात दमदार प्रारभ करत 'ग्रीन संडे' साजरा केला. विविध संस्था, संघटनांच्यावतीनेही वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.

वनविभाग, सामाजिक वनीकरण आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने या वर्षीच्या वृक्ष लागवड मोहीम आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषी दिन पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते रविवारी शेंडा पार्क करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

शेंडा पार्क परिसर हरित सेना आणि विविध शाळातील विद्यार्थ्यांनी बहरुन गेला. या परिसरात 'पेड लगाओ-देश बचाओ', 'झाडांना करू नका नष्ट-श्वास घेताना होईल कष्ट', 'इंधन वाचवा-देश वाचवा', 'वन है तो जल है-जल है तो कल है' या घोषवाक्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. शिवाजी विद्यापीठात ११ हजार रोप लागवडीचा प्रारंभही पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते वडाचे झाड लावून करण्यात आला.



१३ कोटी वृक्षलागवड मोहिमेंतर्गत शेंडा पार्क येथे रविवारी वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थितात जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदी.

पालकमंत्री पाटील म्हणाले, 'जिल्ह्यात यावर्षी २८ लाख ७१ हजार रोपे लावण्याचे नियोजन आहे. रोपांची केवळ लागवड करून चालणार नाही. या रोपांचे संवर्धन महत्त्वाचे आहे. गेल्या वर्षी झालेल्या वृक्षारोपण मोहिमेत ९० टक्के रोपे जगली आहेत. शेंडा पार्क परिसरात ३६ हेक्टर क्षेत्रात ४० हजार रोपे लावण्याचे नियोजन आहे. यामध्ये जांभूळ, निलमोहर, आंबा, आवळा, करंज, रिठा अशा स्थानिक प्रजातीची रोपे लावली आहेत. ही मोहीम अधिक गतिमान करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.'

यावेळी जि. प. अध्यक्षा शौमिका महाडिक, आमदार अमल महाडिक, संदीप देसाई, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, वन संरक्षक अरविंद पाटील, राजर्षी शाहू कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता गजानन खोत, उप वनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, विभागीय वनअधिकारी दीपक खाडे, कृषी सहसंचालक उमेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी, उपविभागीय वन अधिकारी मानिकराव भोसले, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपजिल्हाधिकारी अमित माळी, कृषी विकास अधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

### 'वृक्ष संगोपन, ठिबक योजना तयार करा'

'शेंडा पार्क येथील झाडांचे संगोपन, ठिबक सिंचन यासाठी कृषी महाविद्यालयाने चांगली योजना तयार करावी. त्यासाठी सरकार निधी उपलब्ध करून देईल. या परिसरात ४० हजार रोपांचे संगोपन आणि पाण्याची व्यवस्था करण्यासाठी बोअरवेल, शेततळे तसेच ठिबकसिंचन यासह शहरातील ओढे, नाल्यांतील सांडपाण्यावर प्रक्रिया करून हे पाणी या झाडांसाठी वापरता येणे शक्य आहे का? याचाही विचार व्हावा. त्यासाठी कृषी महाविद्यायाने वन विभागाच्या सहकार्याने स्वतंत्र एजन्सीद्वारे अभ्यास करून योजना तयार करावी,' अशी सूचना पालकमंत्री पाटील यांनी केली.

### दाम्पत्याला १० रोपे विनामूल्य

'राज्यात वृक्षारोपणाला चालना देण्यासाठी सरकारने अनेक योजना जाहीर केल्या आहेत. रोपे आपल्या दारी, वनमहोत्सव, कन्या वन समृद्धी योजना अशा महत्त्वाच्या योजना आहेत. जन्मवृक्ष, शुभमंगल वृक्ष, माहेरची झाडी, आनंदवृक्ष, स्मृतीवृक्ष अशा योजनाही वन व सामाजिक वनीकरण विभागामार्फत राबविला जात आहे. कन्या वन समृद्धी योजनेअतंर्गत ज्या कुटुंबामध्ये मुलगी जन्माला येईल, अशा शेतकरी दाम्पत्याला १० रोपे विनामूल्य दिली जातील. यामध्ये पाच रोपे सागवान, दोन आंब्याची आणि फणस, जांभूळ आणि चिंचेचे प्रत्येकी एक रोप दिले जाईल. लागवड केलेल्या झाडापासून मिळणारे उत्पन्न मुलीच्या भविष्यासाठी उपयोगी येईल, ही योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबवा,' असे आवाहनही पाटील यांनी केले.



### 'कृषी प्रक्रिया उद्योग उभे करा'

'तालुका-तालुक्यात शेतकऱ्यांनी कृषी उत्पादन वाढीसह कृषी प्रक्रिया कारखानदारी उभी करावी. त्यांना आवश्यक ते सहकार्य केले जाणार असून गावातील पालापाचोळ्यापासून इथेनॉल निर्मितीचे प्रकल्पही उभारण्यात शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा,' असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. वृक्षारोपण झाल्यानंतर माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील म्हणाले, 'जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहीम यस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणा सक्रिय झाल्या आहेत. त्यात सातत्य ठेवण्याची गरज आहे. वृक्ष जोपासण्यासाठी प्रयत्न करा.' सहाय्यक वनसंरक्षक विजय गोसावी यांनी आभार मानले.

2 JUL 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वृक्ष जोपासण्याची जबाबदारी घ्या

**पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन; वृक्ष लागवड मोहिमेचा पालकमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ, -राज्यात ५ वर्षात ५० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट**

प्रतिनिधी
कोल्हापूर

पर्यावरण संतुलनासाठी शासनाने पाच वर्षात ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून आतापर्यंत ७ कोटी वृक्ष लागवड झाली आहे. यंदा १३ कोटी वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट असून उद्दीष्टापेक्षा जास्त वृक्षारोपण केले जाईल. मात्र वृक्षारोपणाबरोबरच ती जोपासण्याची जबाबदारी सर्वांनीच घ्यावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. वन विभाग, सामाजिक वनीकरण आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते शेंडा पार्क परिसरात करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, दिवसेंदिवस कमी होत चाललेली वृक्षसंपदा पर्यावरणाच्या दृष्टीने चिंतेची बाब ठरत आहे. राज्यात पर्यावरण रक्षणासाठी किमान ४०० कोटी झाडे लावणे गरजेचे आहे; असे पर्यावरणतज्ज्ञांचे मत आहे. हाच धागा पकडून राज्य शासनाने २०१९ पर्यंत राज्यात ५० कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्धार केला आहे. वृक्ष लागवड जितकी महत्वाची आहे, तितकेच महत्वाचे हे वृक्ष जगविणे हे आहे. वृक्ष संवर्धनासाठी संपूर्ण समाजाने सक्रीय योगदान देणे गरजेचे आहे. वृक्षसंवर्धन ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही ते म्हणाले. राज्यात पहिल्या वर्षी १ कोटी, दुसऱ्या वर्षी २ कोटी तिसऱ्या वर्षी ४ कोटी आणि यंदा १३ कोटी वृक्ष लागवड करण्यात येत आहे. उर्वरित ३३ कोटी वृक्ष लागवड पुढील वर्षी करण्याचा संकल्प असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी आमदार अमल महाडिक, जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, वन संरक्षक अरविंद पाटील, संदिप देसाई, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, उप वन संरक्षक प्रभुनाथ शुक्ल, वनअधिकारी दीपक खाडे, उमेश पाटील आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. सोबत जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जि. प. सीईओ डॉ. कुणाल खेमनार, अरविंद पाटील, संदिप देसाई, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्रभुनाथ शुक्ल आदी.**

### शेंडा पार्क येथील झाडांच्या संगोपनासाठी योजना तयार करा– पालकमंत्री

शेंडा पार्क येथील झाडांच्या संगोपनासाठी कृषी महाविद्यालयाने सविस्तर योजना तयार करावी. त्यासाठी शासनाच्या योजनेतून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

या परिसरात ४० हजार झाडांची संगोपन आणि पाण्याची व्यवस्था करण्यासाठी बोअर, शेततळे तसेच ठिबकसिंचन या गोष्टीबरोबरच शहारातील ओढे, नाल्यांतील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन हे पाणी या झाडांसाठी वापरता येणे शक्य आहे का, यासाठी कृषी महाविद्यालयाने वन विभागाच्या सहकार्याने योजना तयार करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

### कृषी प्रक्रीया कारखानदारी उभी करा : पालकमंत्री ना. पाटील

राज्यातील शेतकऱ्यांना सुखी आणि समृध्द करण्यासाठी शासनातर्फे अनेक योजना राबविल्या जातात. प्रत्येक तालुक्यात शेतकऱ्यांनी कृषी उत्पादन वाढीबरोबरच कृषी प्रक्रीया कारखानदारी उभी करावी. शासनातर्फे त्यांना आवश्यक ते सहकार्य केले जाईल. पालापाचोळ्यापासून इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प उभारण्यात शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करत शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला बाजारपेठा उपलब्ध करुन देण्यास प्रयत्नशील असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

### विद्यापीठ परिसरात तेरा हजार वृक्ष लागवडीचा मानस

गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेल्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत शिवाजी विद्यापीठाने प्रभावी कामगिरी बजावली आहे. लावलेल्या वृक्ष संवर्धनाचा दरही ९० टक्क्यांच्या घरात आहे. त्यामुळे वृक्ष लागवडीबरोबरच वृक्षांची जोपासना करण्याच्या बाबतीतही विद्यापीठाचा लौकिक आहे. यंदाही विद्यापीठाने वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने परिसरात तेरा हजार वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, मुख्य वन संरक्षक अरविंद पाटील, उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, व्ही. टी. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी.टी. गायकवाड, यशवंत भालकर, डॉ. संजय जाधव, डॉ. एन. बी. गायकवाड आदी उपस्थित होते.

2 JUL 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वृक्ष जगवण्यासाठी ठिबक सिंचनचा वापर करा

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील : शक्य तेथे झाडे लावा ; शेंडा पार्कात ४० हजार वृक्ष लावणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यात आतापर्यंत ७ कोटी झाडांची लागवड झाली आहे. यंदा १३ कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट असून, उद्दिष्टापेक्षा जास्त झाडे लावली जातील. झाडे लावण्याबरोबरच ती जोपासण्याची आणि टिकवण्याची खबरदारी सर्वांनीच घ्यावी. झाडे लावल्यावर पाण्याची सोय आहे, असे बोलायचे बंद करा. त्याऐवजी ठिबक सिंचन, शेततळे, बोअरिंग तसेच पाण्याचे साठे करून झाडांना पाण्याची सोय करा, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी येथे केले.

वन विभाग, सामाजिक वनीकरण आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने यंदाची वृक्ष लागवड मोहीम तसेच स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषिदिनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते शेंडा पार्क परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, आमदार अमल महाडिक, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, वन संरक्षक अरविंद पाटील, राजर्षी शाहू कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता गजानन खोत, उप वनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, विभागीय वनअधिकारी दीपक खाडे, कृषी सहसंचालक उमेश पाटील आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, दिवसेंदिवस कमी होत चाललेली वृक्षसंपदा ही पर्यावरणाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. राज्यात पर्यावरण रक्षणासाठी किमान ४०० कोटी झाडे लावणे गरजेचे आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे राज्य शासनाने २०१९ पर्यंत राज्यात ५० कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्धार केला आहे. वृक्ष लागवड जितकी महत्वाची आहे, तितकेच महत्त्वाचे हे वृक्ष जगविणे आहे. वृक्ष संवर्धनासाठी संपूर्ण समाजाने सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे. प्रत्येकाने जागा मिळेल तेथे वृक्षारोपण करावेत. गेल्या वर्षी वृक्षारोपण मोहिमेंतर्गत लावलेल्या झाडांचे जगण्याचे प्रमाणही ९० टक्क्यापर्यंत आहे. शेंडा पार्क परिसरात ३६ हेक्टर क्षेत्रात ४० हजार झाडे लावण्याचे नियोजन आहे. यामध्ये प्रामुख्याने जांभूळ, निलमोहर, आंबा, आवळा, करंज, रिठा अशा स्थानिक प्रजातीची झाडे लावण्यावर भर दिला जात आहे. जिल्ह्यात वृक्षारोपणाची मोहीम अधिक गतिमान करून संपूर्ण जिल्हा हरित करण्यासाठी सर्वांनी सक्रिय राहू या, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व ग्रीन आर्मीच्या सदस्यांनी वृक्षारोपण केले.



**कोल्हापूर : वृक्ष लागवड मोहिमेचा रविवारी प्रारंभ करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. सोबत डावीकडून डॉ. कुणाल खेमनार, अरविंद पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. आर. मोरे आदी मान्यवर.**

2 JUL 2018
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात तेरा हजार वृक्ष लागवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या तेरा कोटी वृक्ष लागवड मोहिमेंतर्गत रविवारी शिवाजी विद्यापीठात सुमारे तेरा हजार रोपांची लागवड करण्यात आली. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वृक्ष लागवड उपक्रमास प्रारंभ करण्यात आला.

विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक परिसरात झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदींसह जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, मुख्य वन संरक्षक अरविंद पाटील, उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील आदींसह अनेक शासकीय अधिकारी, विद्यापीठातील अधिकारी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी वृक्षारोपणप्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभू नाथ, अरविंद पाटील, जिल्हाधिकारी अरविंद पाटील आदींसह मान्यवर.**

## क्रीडा संकुल परिसरातही वृक्षारोपण

विद्यापीठाच्या क्रीडा संकुल परिसरात जांभूळ व पिंपळ वृक्षांची लागवड कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अधिसभा सदस्य यशवंत भालकर, डॉ. संजय जाधव, डॉ. एन. बी. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक उपस्थित होते.

### वृक्ष जगण्याचे प्रमाण ९० टक्के

गेल्या दोन वर्षांपासून राज्य शासनाने हाती घेतलेल्या वृक्षारोपण मोहिमेंतर्गत शिवाजी विद्यापीठाने प्रभावी कामगिरी बजावली आहे. लावलेल्या वृक्षाचे जगण्याचे प्रमाण ९० टक्क्यांच्या घरात आहे. त्यामुळे वृक्ष लागवडीबरोबरच वृक्षांची जोपासना करण्याच्या बाबतीतही शिवाजी विद्यापीठाचा लौकिक आहे.

2 JUL 2018

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Civic chief urges citizens, activists to help improve city's green cover

## KMC To Allow Plantation On Gardens, Free Spaces

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Kolhapur Municipal Corporation (KMC) will initiate public participation towards improving the green cover of the city through tree plantation drives and by making gardens and open spaces available for the citizens, civic chief Abhijeet Chaudhari said on Sunday.

Chaudhari initiated the drive to plant trees in the gardens launched by Maharashtra Times. He raised several concerns over the depleting green cover and claimed that the civic administration is going to roll out a plan to initiate a massive plantation drive during the monsoon. As part of the drive, on Sunday the KMC pledged to plant 10,000 trees in the city in next month. The plantation kick-started from an open space from the Ramanmala area.

"We are going to involve citizens in the drive. We are also planning to bring social organizations on board to plan the plantation drive. The plan of the plantation drive will also include the task of monitoring the growth of the plants. Everyone needs to do their bit towards expanding greenery in their area," Chaudhari added.

The KMC is going to provide plants, of indigenous varieties, to the citizens and organizations for these drives. These plants will be eight to ten feet in height as per the recommendations of experts.

Meanwhile, the district administration started the drive to plant 28.71 lakh trees across the district. District guardian minister Chandrakant Patil kick-started the drive by planting trees at Shenda Park area at the outskirts of the city. Patil said that the state government has set the target of planting 50 crore trees and has already planted 7 crore and aim to plant over 13 crore trees within this year.

"As per the experts we need to plant 400 crore trees across the state to protect the environment. By 2019 we will end up plating 50 crore trees. We expect the contribution of the social organizations and the citizens to look after the planted trees. Next year, we will set a new target of planting 33 crore trees," Patil said.

The district administration has planned to plant 40,000 trees in Shenda Park area over 36 hectares of land. The minister asked the officials to plan a drip irrigation system to grow the trees. Patil also asked the experts to plan to utilize the sewage water to grow these trees.

### Over 13,000 saplings planted at varsity

Over 13,000 saplings were planted at the Shivaji University, Kolhapur (SUK) campus on Sunday. According to officials, the saplings were of different varieties and district guardian minister Chandrakant Patil and vice-chancellor Devanand Shinde along with other authorities took part in the initiative.

The drive started near the Synthetic track of the varsity. Officials said that the drive that was organized last year and had around 90% survival rate.

Piyush Bhusari





Several senior leaders and citizens took part in plantation drives across the city on Sunday

2 JUL 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

नसीर अतार



कोल्हापुरातील शेंडा पार्क येथे रविवारी वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, आमदार अमल महाडिक, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, अरविंद पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# सांडपाण्याचा वापर शेतीसाठी

## पालकमंत्री : योजनेसाठी आवश्यक निधीची ग्वाही; वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ओढ्या-नाल्यांतून वाहणाऱ्या सांडपाण्यामुळे होणारे पंचगंगा प्रदूषण रोखण्यासाठी या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीसाठी व झाडांसाठी वापरता येऊ शकते, यासाठी आमदार अमल महाडिक यांनी पुढाकार घेऊन याचे काम आठवडाभरात सुरू करावे, याकरिता लागेल तो निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी येथे दिली.

वनविभाग, सामाजिक वनीकरण आणि कृषी विभागातर्फे यंदाच्या वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ शेंडा पार्क येथे करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, पंचगंगा नदीप्रदूषणाची समस्या सुटण्यासाठी काही ठोस उपाययोजना कराव्या लागणार आहेत. नाले व ओढ्यांमधील सांडपाणी पंचगंगा नदीत मिसळण्याचे प्रमाण कमी झाले तर हा प्रश्न बऱ्यापैकी संपू शकतो. यामुळे या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीसाठी तसेच झाडांकरिता वापरावे, असे केल्यास झाडांना व शेतीला लागणाऱ्या पाण्याचाही प्रश्न सुटेल.

पालकमंत्री पाटील म्हणाले, तज्ज्ञांच्या मते पर्यावरण संतुलनासाठी राज्यात किमान ४०० कोटी झाडे लावणे गरजेचे आहे. शासनाने पाच वर्षांत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून या वृक्षांच्या संवर्धनासाठी संपूर्ण समाजाने सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे. राज्यात पहिल्या वर्षी १ कोटी, दुसऱ्या वर्षी २ कोटी, तिसऱ्या वर्षी ४ कोटी आणि यंदा १३ कोटी वृक्षलागवड करण्यात (पान ४ वर)

### यंदा २८ लाख ७१ हजार झाडे लावण्याचे नियोजन

जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात २८ लाख ७१ हजार झाडे लावण्याचे नियोजन असल्याचे सांगून लावण्यात येणारी झाडे ९५ ते १०० टक्क्यांपर्यंत जिवंत राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

### झाडांच्या संगोपनासाठी पाणी अन् ठिबक

शेंडा पार्क येथील झाडांचे संगोपन, पाणी आणि ठिबक यासाठी कृषी महाविद्यालयाने सविस्तर योजना तयार करावी, त्यांना शासन योजनेतून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली.


# सांडपाण्याचा वापर शेतीसाठी


(पान १ वरून) येत आहे. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शौमिका महाडिक, आमदार अमल महाडिक, महानगर जिल्हाध्यक्ष संदीप देसाई, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, वनसंरक्षक अरविंद पाटील, राजर्षी शाहू कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता गजानन खोत, उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, विभागीय वनाधिकारी दीपक खाडे, कृषी सहसंचालक उमेश पाटील, आदी प्रमुख उपस्थित होते.

### कन्या वनसमृद्धी योजनेंतर्गत विनामूल्य १० रोपे

- कन्या वनसमृद्धी योजनेंतर्गत ज्या कुटुंबामध्ये मुलगी जन्माला येईल, अशा शेतकरी दाम्पत्याला १० रोपे विनामूल्य दिली जातील.
- यामध्ये ५ रोपे सागाची, २ आंब्याची आणि फणस, जांभूळ व चिंचेचे प्रत्येकी एक रोप दिले जाईल.
- लागवड केलेल्या झाडापासून मिळणारे उत्पन्न मुलीच्या भविष्यासाठी उपयोगी येईल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

### १५ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत 'वनमहोत्सव'

- वन विभागातर्फे जिल्ह्यात १ कोटी २८ लाख रोपे तयार असून, ती १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत वन महोत्सवाचे आयोजन करून जनतेला सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध करून दिली जातील.
- १० जुलैपर्यंत 'रोपे आपल्या दारी' या योजनेतून शहरात ४ स्टॉल रोपे विक्रीसाठी सज्ज केल्याचेही अरविंद पाटील यांनी सांगितले.

### कृषी प्रक्रिया कारखानदारी उभी करा

- तालुक्यात शेतकऱ्यांनी कृषी उत्पादन वाढीबरोबरच कृषी प्रक्रिया कारखानदारी उभी करावी, त्यांना आवश्यक ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही देत गावातील पालापाचोळ्यापासून इथेनॉल निर्मितीचे प्रकल्पही उभारण्यात शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही पालकमंत्र्यांनी केले.

- शासनाने पाच वर्षांत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून, या वृक्षांच्या संवर्धनासाठी समाजाने सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे.

2 JUL 2018 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रारंभ : वृक्ष जगण्याचा दर ९० टक्के

# शिवाजी विद्यापीठात १३ हजार रोपांची लागवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्य शासनाच्या तेरा कोटी वृक्षलागवड मोहिमेअंतर्गत शिवाजी विद्यापीठात सुमारे तेरा हजार रोपांच्या लागवडीस पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते रविवारी प्रारंभ करण्यात आला.

या वर्षी विद्यापीठाने वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने परिसरात तेरा हजार वृक्षलागवडीचा संकल्प केला आहे. त्याचा प्रारंभ विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक परिसरात सकाळी पावणेअकरा वाजता पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील, उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते. गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेल्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत विद्यापीठाने प्रभावी कामगिरी बजावली आहे. लावलेल्या वृक्षांचा जगण्याचा दर ९० टक्क्यांपर्यंत आहे. दरम्यान, पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीआरसीआय) कोल्हापूर चॅप्टरच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठाच्या परिसरात बोधिवृक्षांची लागवड केली. यावेळी 'पीआरसीआय'च्या कोल्हापूर चॅप्टरचे अध्यक्ष आलोक जत्राटकर, उपाध्यक्ष सतीश ठोंबरे, राजेश शिंदे, रविराज गायकवाड, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात रविवारी शिवाजी विद्यापीठात तेरा हजार वृक्षलागवड अभियानाचा प्रारंभ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. अविनाश सुभेदार, डॉ. डी. आर. मोरे, आदी उपस्थित होते.

## जांभूळ, पिंपळाची लागवड

विद्यापीठाच्या क्रीडासंकुल परिसरात जांभूळ व पिंपळ वृक्षांची लागवड कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. शिर्के, डॉ. पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, आर. व्ही. गुरव, डी. के. गायकवाड, पी. टी. गायकवाड, अधिसभा सदस्य यशवंत भालकर, संजय जाधव, एन. बी. गायकवाड, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUL 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात ११ हजार झाडे लावणार

**कोल्हापूर, ता. १ :** शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात ११ हजार झाडे लावण्यात येणार असून या मोहिमेचा प्रारंभ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वडाचे झाड लावून करण्यात आला. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, वन संरक्षक अरविंद पाटील, उपवन संरक्षक प्रभुनाथ शुक्ल, विभागीय वन अधिकारी दीपक खाडे, कृषी सहसंचालक उमेश पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUL 2018
Times of India

# University to begin online profiling of students soon

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** 'Online profiling' of students entering Shivaji University, Kolhapur (SUK), is set to begin in July. Information about students – the name of the applicant, college, address, course admitted to and the category under which applicant is admitted will be collected online and regularly updated.

Pro vice chanceloor DT Shirke told **TOI** the online link will be made available soon for students. The information gathered will be used for generating hall tickets during semester examinations of the SUK. New students will fill in the information while gaining admission, and already enrolled students will have to update their details in accordance with their academic progress.

If students fail to update information, hall tickets will be generated with outdated information. That could cause confusion and result in loss of time for both students and administrative staff, the pro vice chancellor said.

"The link is yet to be made available to students. We will be reviewing the situation on Monday and will start the initiative at the earliest," he said, adding that over 80,000 first-year undergraduate students affiliated to the different colleges and the Centre of Distance Education will have to fill in their data.

Shirke said students can monitor the data. Earlier, this data was collected on paper. The website is easy for students to understand and there is a section on the portal that students can use if they need help understanding the profiling process, a university official explained.

## INFO FOR HALL TICKETS



- Students update details of the course opted for, subjects in the course, their name, college, address, the category under which they are admitted and other details
- Earlier, colleges collected this material on paper. Spelling mistakes would appear often and details of the category in which applicant was admitted was often not recorded; there was also no periodic updating of data once gathered
- Online profiling is now compulsory for all students admitted this year. It is also compulsory for students currently enrolled whether in BA, BCom and BSc courses or in professional courses

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUL 2018
Times of India

# Degree courses at DKTE institute get NBA accreditation

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The degree courses offered at the Ichalkaranji-based DKTE society's Textile and Engineering Institute have been awarded accreditation from The National Board of Accreditation (NBA) has awarded accreditation, according to a press

**CAMPUS BUZZ**

note from the college.

The NBA accreditation is a process of quality assurance and improvement where by a course in an approved institution is critically appraised to verify that the course continues to meet norms and standards prescribed by regulator from time to time.

NBA accreditation is a kind of recognition which indicates that a course fulfils the standards of the National Board of Accreditation (NBA), India, which was established by All India Council of Technical Education (AICTE) for periodic evaluations of technical institutions programs basis according to specified norms and standards as recommended by AICTE council. NBA ranking ensures students, guardians, industries and an entire society with excellent education, the press note stated.

### Kitchen garden training programme at varsity

The Lok vikas kendra of Shivaji University, Kolhapur (SUK) is offering a 16-week course on kitchen garden training at its campus. The free program will start from Thursday, July 5. According to officials the course will be conducted every week on Thursday from 1pm to 3pm at its campus. Interested persons can contact Manjusha Deshpande on 9158990530 for further details.

### Electrical engineering on offer at KIT

The Kolhapur Institute of Technology (KIT) College of Engineering is offering the Electrical Engineering course from this academic year (2018-19) onwards, said director, Vilas Karjinni. He added that the intake of the Computer Science has also been doubled from 60 earlier to 120

2 JUL 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यात २८ लाख ७१ हजार वृक्ष लागवड

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील; शेंडा पार्क येथे मोहिमेचा प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोल्हापूर जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात २८ लाख ७१ हजार झाडे लावण्याचे नियोजन आहे. त्यामध्ये लावण्यात येणारी झाडे ९५ ते १०० टक्क्यापर्यंत जिवंत राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देऊन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले. वन विभाग, सामाजिक वनीकरण आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या वृक्ष लागवड मोहिमेचा प्रारंभ तसेच वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषिदिनाच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते.

शेंडा पार्क परिसरात झालेल्या या कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, आमदार अमल महाडिक, संदीप देसाई, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, वन संरक्षक अरविंद पाटील, राजर्षी शाहू कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता गजानन खोत, उपवनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, विभागीय वन अधिकारी दीपक खाडे, कृषी सहसंचालक उमेश पाटील यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शेंडा पार्क येथे वृक्ष लागवड मोहिमेच्या प्रारंभप्रसंगी बोलताना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील. सोबत जि. प. अध्यक्षा शौमिका महाडिक, आ. अमल महाडिक, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

दिवसेंदिवस कमी होत चाललेली वृक्षसंपदा ही पर्यावरणाच्या दृष्टीने चिंतेची बाब असल्याचे सांगून पालकमंत्री पाटील म्हणाले, राज्यात पर्यावरण रक्षणासाठी किमान ४०० कोटी झाडे लावणे गरजेचे आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. हाच धागा पकडून राज्य शासनाने २०१९ पर्यंत राज्यात ५० कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्धार केला असून, वृक्ष लागवड जितकी महत्त्वाची आहे, तितकेच महत्त्वाचे हे वृक्ष जगविणे हे आहे, वृक्ष संवर्धनासाठी संपूर्ण समाजाने सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे. वृक्ष संवर्धन ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही ते म्हणाले. राज्यात पहिल्या वर्षी १ कोटी, दुसऱ्या वर्षी २ कोटी, तिसऱ्या वर्षी ४ कोटी आणि यदा १३ कोटी वृक्ष लागवड करण्यात येत आहे. उर्वरित ३३ कोटी वृक्ष लागवड पुढील वर्षी करण्याचा संकल्प आहे.

### कन्या वन समृद्धी योजनेत १० रोपे विनामूल्य

राज्यात वृक्षारोपणाला चालना देण्यासाठी शासनाने अनेकविध योजना जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये रोपे आपल्या दारी, वनमहोत्सव, कन्या वन समृद्धी योजना अशा महत्त्वाच्या योजनांचा समावेश आहे. याबरोबरच जन्म वृक्ष, शुभमगल वृक्ष, माहेरची झाडी, आनंद वृक्ष, स्मृती वृक्ष अशा योजनाही राबविण्यात येत आहेत. कन्या वन समृद्धी योजनेंतर्गत ज्या कुटुंबामध्ये मुलगी जन्माला येईल, अशा शेतकरी दाम्पत्याला १० रोपे विनामूल्य दिली जातील. यामध्ये ५ रोपे सागाची, २ आंब्याची आणि फणस, जांभूळ आणि चिंचेचे प्रत्येकी एक रोप दिले जाणार असल्याचेही पालकमंत्री पाटील यांनी सांगितले.

### कृषिप्रक्रिया कारखानदारी उभी करा

तालुका तालुक्यांत शेतकऱ्यांनी कृषी उत्पादनवाढीबरोबरच कृषिप्रक्रिया कारखानदारी उभी करावी. त्यांना आवश्यक ते सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. राज्यातील शेतकऱ्यांना सुखी आणि समृद्ध करण्यासाठी शासन अनेकविध योजना राबवित असल्याचे सांगून पालकमंत्री पाटील म्हणाले, गावातील पालापाचोळ्यापासून इथेनॉलनिर्मितीचे प्रकल्पही उभारण्यात शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला बाजारपेठा उपलब्ध करून देण्यासही प्राधान्य दिले जाईल. या समारंभाप्रसंगी राज्यस्तरीय पीक स्पर्धेतील विजेत्यांचा, जमीन आरोग्य-पत्रिकाधारक शेतकरी तसेच कन्या वनसमृद्धी योजनेतील शेतकरी दाम्पत्यांना पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते रोप देऊन सत्कार करण्यात आला. सहायक वन संरक्षक विजय गोसावी यांनी आभार मानले.

या समारंभास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी, उपविभागीय वन अधिकारी माणिकराव भोसले, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपजिल्हाधिकारी अमित माळी, कृषिविकास अधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी तसेच अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. शेंडा पार्क परिसर हरितसेना आणि विविध शाळातील विद्यार्थ्यांनी बहरुन गेला होता. या परिसरात 'पेड लगाओ-देश बचाओ', 'झाडांना करू नका नष्ट, श्वास घेताना होईल कष्ट', इंधन वाचवा - देश वाचवा, 'वन है तो जल है- जल है तो कल है' अशा घोषवाक्ये ठळकपणे लावण्यात आली होती.

### विद्यापीठात ११ हजार झाडे लावण्यास प्रारंभ

राज्यात १३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात ११ हजार झाडे लावण्यात येत आहेत. या मोहिमेचा प्रारंभ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वडाचे झाड लावून करण्यात आला. या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, वन संरक्षक अरविंद पाटील, उप वन संरक्षक प्रभुनाथ शुक्ल, विभागीय वन अधिकारी दीपक खाडे, कृषी सहसंचालक उमेश पाटील आदी उपस्थित होते.



**तळसंदे : येथील विष्णू जलाशय परिसरात वृक्षारोपण करताना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, सरपंच अमर पाटील यांच्यासह अन्य.**

## तळसंदेत ३० हजार वृक्षारोपण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

तळसंदे गावाच्या विष्णू जलाशय परिसरात ३० हजार झाडे लावण्याचा उपक्रम प्रेरणादायी आहे. तळसंदे गाव पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी लागणारा निधी जिल्हा नियोजन समितीतीतून उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

तळसंदे ग्रामपंचायत आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने ३० हजार झाडे लावण्यात येत असून, या मोहिमेचा प्रारंभ पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास सरपंच अमर पाटील, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी दीपक खाडे, प्रा. पी. डी. पाटील, उपसरपंच संग्राम शिंदे यांच्यासह मान्यवर, पदाधिकारी, अधिकारी, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते. विभागीय वन अधिकारी दीपक खाडे यांनी माहिती दिली. सरपंच अमर पाटील यांनी स्वागत केले. सदस्य शिवाजी प्राटील यांनी प्रास्ताविक केले. समारंभास ग्रामस्थ, विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.